नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०२०

(CNR NO. MHNS13009342020)

**निशाणी क्र. ३२ वर आदेश**

**( कुसुम ..वि.. पंडीत )**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी आणि त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जावर प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास आक्षेप नोंदविला नाही.

(२). वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र.१ हे प्रस्तुत दावा प्रलंबित असतांना दि. १७/०५/२०२१ रोजी मयत झाले. प्रस्तावित प्रतिवादी क्र. २अ आणि २ब हे प्रतिवादी क्र.१ चे वारस असुन त्यांना प्रतिवादी क्र. २ च्या जागी दावा चालविण्याचा हक्क व अधिकार आहे. सबब, अर्ज मंजुर करण्यात यावा.

(३). वादपत्राचे अवलोकन केले. वादपत्रावरुन वाद स्थावर मिळकतीचा असुन ठराव करुन मिळणेसाठीचा आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ हे दि.१७/०५/२०२१ रोजी मयत झाले असुन दावा गुणवतत्तेवर चालण्यासाठी प्रतिवादी क्र.२ चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. ३२ मंजुर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावीत दुरुस्ती पुढील तारखेस करुन दुय्यम प्रत दाखल करावी.

**(खुल्या न्यायालयात जाहीर व अधिघोषित)**

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.06.11 17:00:57 +0530

दिनांकः- ११/०६/२०२५

(पी.डी.कोळेकर)

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

पिंपळगांव (बसवंत )